# प्रेस नोट

## "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना"

## या योजनेंतर्गत पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली व त्यांच्या अधिनस्त कार्यालय व पोलीस ठाणेमध्ये १४० पदावर प्रशिक्षणाची संधी

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्या संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. युवक युवतींना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी या कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे १२ वी पास ६ हजार, आयटीआय/पदवीका ८ हजार व पदवीधर/पदव्युत्तर १० हजार शासनाकडून विद्यावेतन दिले जाणार आहे. सदर कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असणार आहे. तसेच प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

**पोलीस अधीक्षक कार्यालय, सांगली तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालय व पोलीस ठाणेमध्ये करीता खालील प्रमाणे जागा भरावयाच्या आहेत.**

| अ. क्र. | कार्यालय/पोलीस ठाणेचे नांव | शैक्षणिक पात्रता | पदाचे नांव | पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय मिरज व अधिनस्त पोलीस ठाणे. | पदवीधर,टंकलेखन (मराठी ३० किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि) MSCIT | ट्रेनी डाटा एन्ट्री ऑपरेटर/ ऑफिस असिसटंट | ५१ |
| २. | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय मिरज व अधिनस्त पोलीस ठाणे (मिरज तालुका) | पदवीधर,टंकलेखन (मराठी ३० किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि) MSCIT, | ट्रेनी डाटा एन्ट्री ऑपरेटर/ऑफिस असिसटंट | १४ |
| ३. | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय इस्लामपूर व अधिनस्त पोलीस ठाणे (वाळवा व शिराळा तालुका) | पदवीधर,टंकलेखन (मराठी ३० किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि) MSCIT, | ट्रेनी डाटा एन्ट्री ऑपरेटर/ऑफिस असिसटंट | १६ |
| ४. | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय तासगांव व अधिनस्त पोलीस ठाणे (तासगांव व पलूस तालुका) | पदवीधर,टंकलेखन (मराठी ३० किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि) MSCIT, | ट्रेनी डाटा एन्ट्री ऑपरेटर/ऑफिस असिसटंट | १६ |
| ५. | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय विटा व अधिनस्त पोलीस ठाणे (विटा, आटपाडी व कडेगांव तालुका) | पदवीधर,टंकलेखन (मराठी ३० किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि) MSCIT, | ट्रेनी डाटा एन्ट्री ऑपरेटर/ऑफिस असिसटंट | १६ |
| ६. | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय जत व अधिनस्त पोलीस ठाणे (जत व कवठेमहांकाळ तालुका) | पदवीधर,टंकलेखन (मराठी ३० किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि) MSCIT, | ट्रेनी डाटा एन्ट्री ऑपरेटर/ऑफिस असिसटंट | १६ |
| ७. | बिनतारी संदेश | आयटीआय/ पदवीका | विजतंत्री/ वायरमन, तांत्रीक हेल्पर | ०७ |
| ८. | मोटार विभाग सांगली | आयटीआय/ पदवीका | ऑटो इलेक्ट्रीक,<br>मोटार मेकॅनिक<br>डिझेल मेकॅनिक<br>मोटार सायकल मेकॅनिक | ०१<br>०१<br>०१<br>०१ |

Scanned with OKEN Scanner

**उमेदवाराची पात्रता**

१. उमेदवार एम्लॉयमेंटकार्ड काढलेले असावे.

२. उमेदवारचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्षे असावे

३. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

४. उमेदवाराची आधार नोंदणी असावी.

५. आधार संलग्न असलेले बँक खाते पासबुक/ कॅन्सल चेक असावा.

६. शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेस पात्र नाहीत.

तरी वरील पदांसाठी **सोमवार दि. ०९.०९.२०२४ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली येथे निवड मेळावा आयोजित केलेला** आहे. **तरी १८ ते ३५ वयोगटातील इच्छूक उमेदवारांनी मुलाखतीस येताना शैक्षणिक कागदपत्राच्या मुळ प्रती व दोन छायांकित प्रती तसेच** एम्लॉयमेंट कार्ड, आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेच्या पासबुकच्या दोन प्रती घेऊन उपस्थित रहावे व उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी तसेच ज्या उमेदवारांनी एम्लॉयमेंट कार्डची नोंदणी केलेली नाही अशाही उमेदवारांनी मुलाखतीस उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सांगली, मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, विजयनगर सांगली येथे संपर्क साधावा

-----ooooo-----

Scanned with OKEN Scanner